हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

# मासिक नवस्नेह



ब्रह्मतेजो बलंबलम्

वर्ष १० वे : अंक १
एप्रिल २०२४

स्वागतमूल्य
₹. 30/-



|| जय श्रीराम ||

प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

# कोल्हापूर चित्पावन संघाच्या विविध कार्यक्रमाची क्षणचित्रे





दि, १६/०२/२०२४ रोजी जागतिक सूर्यनमस्कार दिन व रथसप्तमीच्या निमित्ताने कोल्हापूर चित्पावन संघ येथील योगवर्गात बारा साधकांनी सौ. सिद्धी बकरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येकी १०८ सूर्यनमस्कार घालण्याचा उपक्रम पूर्ण केला. या उपक्रमासाठी श्री. रोहित गवळी यांची मोलाची साथ लाभली.



महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचालनालयातर्फे हौशी संगीत नाट्य स्पर्धेत अखिल चित्पावन ब्राह्मण विद्यार्थी सहाय्यक मंडळातर्फे 'संगीत ययाति-देवयानी' या नाटकाचा प्रयोग केशवराव भोसले नाट्यगृहात नुकताच उत्तम प्रकारे सादर केला गेला. यावेळी कोल्हापूर चित्पावन संघाचे अध्यक्ष श्री. मकरंद करंदीकर, उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे यांच्यासह सर्व संचालक कलाकारांना उत्तेजन देण्यासाठी उपस्थित होते. श्री परशुरामांची मूर्ती देऊन सर्व कलाकारांचा सत्कार करण्यात आला.



योगा सर्टिफिकेशन बोर्ड, भारत सरकार तर्फे झालेल्या 'योगाभ्यास' परीक्षेत उत्तम यश मिळवून 'योगा प्रोटोकॉल इन्स्ट्रक्टर' हे मानांकन मिळवलेल्या सौ. मृणालिनी आपटे यांचा परशुराम चषक क्रिकेट बोर्डातर्फे नुकताच सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगाचे क्षणचित्र.

# हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाची मराठी दिनदर्शिका

गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही संघाच्या वतीने गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर म्हणजेच मंगळवार, दि. ९ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ठीक १० वाजता आपल्या संघाच्या कार्यालयात 'मराठी दिनदर्शिका प्रकाशन सोहळा' आयोजित केला आहे. संघाची ही दिनदर्शिका सलग दुसऱ्या वर्षी प्रकाशित होत आहे. या दिनदर्शिकेत चैत्र शुद्ध प्रतिपदा ते फाल्गुन कृष्ण अमावास्या या कालावधीचा समावेश करण्यात आला असून त्यासह इंग्रजी महिने व तारखा सुद्धा देण्यात आलेल्या आहेत. या दिनदर्शिकेत चित्पावन ज्ञातीची माहिती, आडनावे, कुलदैवत, त्यांची ठिकाणे, आपली पारंपरिक व्रतवैकल्ये, कुलाचार या माहितीचा समावेश करण्यात आला आहे.

ही दिनदर्शिका आपल्या ज्ञाती बांधवांसाठी विनामूल्य असून संघाच्या सर्व सदस्यांनी ती आपल्या घरी भिंतीवर अभिमानाने प्रदर्शित करावी असा मनोदय आहे. या दिनदर्शिकेत संघाचे विविध उपक्रम, भावी कार्यक्रम यांची संक्षिप्त माहिती देण्यात आली असून एक पान परिवारासाठी ठेवण्यात आले आहे. यामध्ये आपल्या घरातील सर्वांची माहिती उदा. जन्मतारीख, आधार नंबर, पॅन नंबर, पॉलिसी नंबर, पासपोर्ट नंबर, गॅस कनेक्शन नंबर, वीज जोडणी नंबर, पाणी जोडणी ग्राहक नंबर, घरफाळा ग्राहक नंबर, आप्तेष्टांचे फोन नंबर, आपल्या डॉक्टरांचे संपर्क नंबर इत्यादी सर्व माहिती एकाच वेळी एकाच ठिकाणी मिळण्यासाठी उत्तम सोय केलेली आहे.

या दिनदर्शिकेच्या प्रकाशन सोहळ्यावेळी प्रत्यक्ष येऊन ज्ञातीबांधवांनी ही दिनदर्शिका घेऊन जावी असे आवाहन संघाचे अध्यक्ष श्री. मकरंद करंदीकर व कार्यवाह श्री. केदार जोशी आणि सर्व संचालक मंडळ, सल्लागार मंडळाने केले आहे.

कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

वर्ष १० वे : अंक १ : एप्रिल २०२४

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984

## अनुक्रम

१) **संपादकीय** /४

२) **भ्रमनिरास** /५ – सौ. कमल हर्डीकर

३) **माझी बँकेतील मुशाफिरी** /९ – श्रीकांत शिंत्रे, – शब्दांकन : सौ. ज्योत्स्ना शिंत्रे

४) **मुलांचे पान** / १२

५) **ज्ञानसूर्याची सावली** /१४ – सौ. मंजुश्री गोखले

६) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'** / १७ – सौ. मंजुश्री गोखले

७) **कप ऑफ टी...**/ १८ – वैदेही जोशी

८) **मुस्लिम स्त्री कलाकार** /२१ – प्रकाश गानू

९) **सुपारीच्या सालापासून तंतू (काथ्या) काढण्याची पर्यावरण पूरक पद्धत** / २२ – संकलित

११) **साहित्यिकांची टोपणनावे** / २३ – संकलित

**वधूवर माहिती यादी** /२५

- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०




हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१–२५४६२२५
०२३१–२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५

- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष) 9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष) 9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह) 7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह) 8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार) 8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**


श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611

**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**

या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. २२ वर दिली आहे.**

# संपादकीय...



नमस्कार मंडळी !

काय उन्हाच्या तडाख्यानं हैराण झाला आहात ना? हा सूर्य अक्षरश: आग ओकतोय! थंडावा, शीतलता हे शब्दच कुठेतरी हरवल्यासारखे झाले आहेत. आत्ताच ही अवस्था आहे, तर एप्रिल-मेत काय होईल? नुसत्या विचारानेच घाम फुटतोय ! म्हणजे आधी फुटलेला असतोच, तो वाढतोय ! पण या सूर्य क्रोधापुढं आपण काय करू शकणार? पाणी भरपूर पिणे, उन्हात बाहेर न पडणे, थंड पदार्थ खाणे, पंखा, कूलर, एसी लावणे आणि हाश्यहुश्श करणे, एवढंच आपल्या हातात ! अर्थात या आगीच्या वणव्यातही काही गोष्टी या दिलासा देणाऱ्या आणि प्रचंड उत्साह देणाऱ्या आहेत. त्यातली एक म्हणजे या वर्षीची रामनवमी ! प्रत्यक्ष प्रभू रामचंद्रांच्या स्वत:च्या घरात म्हणजे राम मंदिरात साजरी होणार आहे ! आपण माणसं म्हणतो ना, आपल्या स्वत:च्या घरात सण साजरा करण्याचा आनंद काही वेगळाच ! तसंच आहे. रामप्रभूपण म्हणत असतील ना स्वत:च्या घरात जन्मसोहळा साजरा करण्याचा आनंद काही वेगळाच ! आणि दुसरी दिलासा देणारी गोष्ट म्हणजे अर्थात आपला नवस्नेह !

या महिन्यात आपला संघ काढत असलेल्या हिंदू दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा गुढी पाडव्यादिवशी आहे. मित्रांनो, गुढी पाडव्याला आपण मारे व्हॉटस्‌ॲप वर 'हिंदू नववर्षाच्या शुभेच्छा' ! असं मोठ्या कौतुकानं लिहितो, मग त्याच कौतुकानं ही दिनदर्शिका आपण घ्यायची आहे. आणखी एक कारण सांगू? परवाचीच गोष्ट. माझ्या नातीला मी विचारलं, 'आज तिथी काय आहे गं?' तिनं उलट मलाच विचारलं, 'आज्जी तिथी म्हणजे काय? आणि ती तिथी बिती ती काय असते? ती तारखेप्रमाणे रोज वेगळी असते काय? नाही, तू आज तिथी काय आहे असं विचारलंस ना? म्हणून म्हटलं !' मित्रांनो, फुल मून नाईट आणि नो मून नाईट एवढाच जर या मुलांचा दिनमानाशी संबंध येत असेल ना, तर स्वत:ला हिंदू म्हणवून घेणं आपण सोडलं पाहिजे. ते सोडायला लागू नये म्हणून या दिनदर्शिकेची गरज. अर्थात् ती फक्त भिंतीची शोभा वाढवण्यासाठी नाहीय हेही लक्षात ठेवायला हवं. आणि हे संस्कार मात्र जाणीवपूर्वक करायला हवेत. कारण

**संस्कारों से बडी**
**कोई वसीयत नहीं होती।**
**और ज्ञान से बडी**
**कोई विरासत नहीं होती।**

तेव्हा तिथी म्हणजे काय एवढं तरी मुलांना कळू द्या. नाहीतर आपल्या हिंदू धर्माची पुण्यतिथी साजरी करण्याची वेळ येईल ! असो.

या उन्हापासून आणि उन्हाळ्यापासून आपल्याला आणि आपल्या परिवाराला सांभाळा. चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या, हिंदू वर्षारंभाच्या, स्वत:च्या घरात साजऱ्या होणाऱ्या रामनवमीच्या तुम्हाला सर्वांना नवस्नेहच्या परिवाराकडून अनंत शुभेच्छा ! थांबते !

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# भ्रमनिरास

## (लेखांक ३)

दूध घालणारे मामा गेल्यानंतर नेहा दार लावून आत आली. दूध, पेपर, घरकाम करणाऱ्या मावशी, ताई या साऱ्यांचा पगार आधी दिला पाहिजे, त्यामुळे उद्या बँकेतून कॅश काढून आणा असं प्रथमेशला सांगण्याच्या विचारात नेहा होती. तोवर फोनची रिंग वाजली. माईंचा फोन होता. 'तुम्ही मजेत असाल ना? आम्ही सर्वजण ठिक आहोत. नीता-जावईबापू बरे आहेत. मुलं नियमित शाळेला जातात. मला सुयशची खूप आठवण येते. फोन करण्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे, नवीन महिना सुरू झाला. दूध, पेपर, मावशी, ताई इ. चे पगार द्यावे लागतील. कॅलेंडरवर सर्व हिशेब करून ठेवले आहेत. यासाठी लागणारे पैसे माझ्या कपाटात वरच्या कप्प्यात समोरच एका काळ्या पर्समध्ये ठेवले आहेत. शक्य झाल्यास प्रत्येकाचे किती आणि कोणत्या तारखेला पैसे दिले तेही कॅलेंडरवरच लिहून ठेव.'

इतकं बोलून माईंनी फोन ठेवला.

इथं असताना 'मी संध्याकाळी आल्यावर स्वयंपाक करेन तू उगाच दगदग करू नको' असं सांगणाऱ्या माईंनी घर-ऑफिस सांभाळताना तुला त्रास होत असेल ना? फार ओढाताण तर होत नाही ना? अशी साधी विचारपूसही केली नाही, याचं नेहाला खूप वैषम्य वाटलं. माईंच्या बोलण्यात नेहाला खूप अलिप्तपणा जाणवला. आपण प्रथमेश जवळ कांही दिवसांपूर्वी माई-आप्पांच्या संदर्भात जे कांही बरंच बोललं ते त्यानं माईंना तर सांगितलं नसेल ना? असाही विचार क्षणभर तिच्या मनात आला, पण अंगावर पडलेलं वाळलेलं पान जितक्या सहजपणे आपण खाली टाकतो त्याप्रमाणे हा विचार तिनं क्षणांत दूर सारला.

रविवारची संपूर्ण संध्याकाळ मंडईतून भाजी आणणे आणि त्यातल्या त्यांत थोडीफार निवडून फ्रीजमध्ये ठेवणे यातच संपून गेली. बहुतेक प्रत्येक रविवारी संध्याकाळी प्रथमेशबरोबर नेहा कुठंतरी दूरवर फिरून येत असे ते अजिबातच शक्य झालं नाही. कारण रात्रीचा स्वयंपाक करायचा होता.

सोमवार उजाडला. नेहा लौकर उठली. गेटचं कुलूप काढलं. चहा घेतला. पोळ्याची कणिक भिजवण्यासाठी कणकेचा डबा उघडला, तर कणिक जवळजवळ संपलेलीच. अरे बापरे, आज संध्याकाळी येताना आठवणीनं कणिक आणली पाहिजे.

नेहाने प्रथमेशला हाक मारून म्हटले, 'कणिक आणतोस का?' 'आता कुठं नऊ वाजलेत. त्यात आज सोमवार, बहुसंख्य दुकानं आज बंदच असणार.' प्रथमेश.

म्हणजे आता सकाळी पोळ्या करणे शक्यच नाही हे ध्यानात घेऊन नेहाने आज पोळ्या करायला येऊ नका असा फोनवर मावशींना निरोप दिला. आता पोळ्याच नाहीत, मग भाजी करून काय उपयोग? म्हणून नेहाने भाजी करण्याचा बेतही बदलला.

सकाळच्या जेवणासाठी आणि शिवाय दुपारच्या सुट्टीत खाण्यासाठी डब्यातून नेण्यासाठी पुरेसा होईल एवढा उपमा बनवला. प्रथमेश कांही बोलला नाही, पण सुयशने थोडी कां होईना टिपणी केलीच.

'दुपारी खायला उपमा ठीक आहे, पण जेवतानाही उपमाच हं गणित जरा बिघडलेलंच वाटते.' हे सारं ऐकूनही नेहाने न ऐकल्यासारखे केले.

ऑफिस सुटल्यावर नेहाने दुकानाकडे मोर्चा वळवला. सोमवार असल्यामुळे बहुसंख्य दुकाने बंदच होती. बऱ्यापैकी तंगडतोड केल्यानंतर एका दुकानात एक किलो आटा मिळाला. घरी आल्यानंतर

रात्रीच्या जेवणासाठी पोळी-भाजी वगैरे साग्रसंगीत स्वयंपाक करण्याचे शारिरीक आणि त्यातूनही मानसिक बळ नेहाकडे नव्हते. त्यामुळे पुन्हा बाहेरून जेवण मागवले. काहींशा अबोलपणे जेवणे पार पडली. सारी आवराआवर करणार तोवर नेहाच्या फोनची रिंग वाजली. नेहाच्या आईचा फोन होता. नेहाने हॅलो म्हणताच, तिला क्षणाचीही उसंत न देता त्या बोलू लागल्या –

'नेहा हल्ली तुझं काय चाललय? केव्हाही फोन केला तरी आई, मी आता जरा गडबडीत आहे. नंतर फोन करते हं, म्हणून फोन ठेवतेस आणि तुझा हा नंतर पुन्हा उगवतच नाही. आपण एका गावात राहतो, पण आठवून बघ, तुला घरी येऊन दोन महिने होऊन गेले आहेत. आता या शनिवारी नक्की ये.'

नेहा – अगं आई, ते शक्य नाही. कारण माई-आप्पा गावाला गेले आहेत. अजून पंधरा दिवस तरी येणार नाहीत.

आई – मग त्यात काय विशेष आहे? तू आणि सुयश या. प्रथमेश घरी राहतील.

नेहा – अगं, प्रथमेशच्या जेवणाचं काय?

आई – एवढं काय त्यात? बाहेरून आणतील.

नेहा – आजिबात नको. गेल्या महिन्यात पाठोपाठ बाहेरचं खाऊन पोटाची तक्रार सुरू झाली आहे. आजही पुन्हा बाहेरूनच जेवण मागवलं होतं. त्यामुळे उद्या पुन्हा माझ्यासकट सगळ्यांचं पोट कुरकुरणार हे नक्की. मी आता माई-आप्पा आल्यावरच तुझ्याकडे येईल. आम्ही सगळे छान आहोत. माई नसल्याने मलाच थोडीफार धावपळ आणि कसरत करावी लागते. माई-आप्पा असताना तुझ्याकडे आले तरी सुयश-प्रथमेशच्या जेवणा-खाण्याची काळजी करावी लागत नसे. आणि सोमवारी सकाळी घरी आल्यानंतर जेवण करून माझं आवरून, दुपारचा डबा घेऊन जाता येई. कारण मी घरी येईतोवर माईंचा स्वयंपाक तयार असतो. त्यामुळे ती दोघं गावाहून परत आल्यानंतर मी तुझ्याकडे नक्की येईन. सांभाळून रहा आता. फोन ठेवू? कारण अजून बराच पसारा आवरायचा आहे. असं म्हणत नेहाने फोन ठेवला.

दिवस पळत होते. उद्या रविवार या विचारात नेहा घरी आली. सुयश घरी आला असेल. प्रथमेश आला की तिघांनीही बाहेर कुठंतरी छान फिरून यायचं असे अनेक वेळा मनात रचत नेहा घरी आली. घराला कुलूप म्हणजे अजून सुयश घरी आला नाही? इतका वेळ का लागला? येईल इतक्यात म्हणत तिनं चहा केला. प्रथमेश आला की दोघं निवांत गप्पा मारत चहा घ्यायचा असा विचार चालू असतानाच प्रथमेशचा फोन आला.

आमच्या ऑफिसमधला एक प्रशासकीय कर्मचारी एकदम चक्कर येऊन पडला. आम्ही त्याला दवाखान्यात दाखल केले आहे. त्याच्या घरीही कळवले आहे. पण त्याचे जबाबदार नातेवाईक येईतोवर आम्ही दोघे-तिघेजण दवाखान्यात थांबणार आहोत. त्यामुळे मला घरी यायला किमान सात वाजतील.

नेहाने फोन ठेवला आणि पुन्हा सुयशच्या वाटेकडे डोळे लावून बसली. साडे पाच वाजून गेले होते. नेहाकडे सुयशच्या वर्गशिक्षकांचा फोन होता. त्यांना फोन करून चौकशी करावी म्हणून फोन लावला, तर फोन स्वीच ऑफ आहे असा संदेश आला. आता कुणाला विचारायचं? सुयशच्या एकाही मित्राचा फोन आपल्याकडे नाही. मन इतरत्र गुंतवायचं म्हणून नेहानं माईंना फोन केला. फोनवरून तिकडची चौकशी केली. इकडची सर्व हकिकत सांगितली आणि मुद्दाम बोलत आहोत असं जराही जाणवू न देता सहा वाजले तरी सुयश आला नाही. त्याचीच वाट पाहते आहे असं म्हणाली.

माई पटकन् म्हणाल्या, 'नेहा, आज दहा तारीख ना? त्यांचे वर्गशिक्षक वर्गातल्या सर्व विद्यार्थ्यांना घेऊन प्रदर्शन पहायला जाणार हाते. टाकाऊतून टिकावू, हस्तकला आणि चित्रकला

प्रदर्शन एकाच छताखाली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना घरी यायला सात-सव्वासात होतील. आणि हा निरोप तुम्ही घरी द्या असंही त्यांनी प्रत्येकेला बजावलं होतं. याबद्दल फोनवर सुयश मला बोलला होता, म्हणजे तुलाही तो नक्कीच बोलला असणार. घरातलं सगळं बघायचं आणि जोडीला ऑफिसच्या कामांचा ताण यामुळे तू विसरलीस काय?

नेहा - नाही, नाही. सुयश मलाही बोलला होता. घरी यायला उशीर होईल, पण नेमके केव्हा येऊ हे तो बोलला नाही असं मला वाटतंय.

मनातून निर्धास्त झालेल्या नेहाने फोन ठेवला. आणि नंतर नेहाला आठवलं, तीन तारखेलाच सुयश याबाबत बोलला होता आणि आज शाळेला जाताना गेटमधून आरडा-ओरडा करत तो बहुतेक हेच बोलला होता.

फोनवरचे बोलणे तारीख आणि वेळेसकट माईंच्या लक्षात राहिलं आणि आपण अशा कशा विसरलो?

माई गावाला गेल्यापासून आपण कांहीशा चिडचिड्या झालो आहोत. आपलं कांहीतरी चुकतंय का? या विचारनं मन अस्वस्थ असतं. घरी तर नाहीच, पण हल्ली आपण ऑफिसमध्येही नेहमीप्रमाणे शांतचित्त नसतो. गेल्या दिड महिन्यांत तिच्या अनेक सहकाऱ्यांनी नेहाला प्रश्न विचारून खरं तर हैराण केलं होतं.

'मिसेस पाटील, तुमची तब्बेत ठिक आहे ना? नेहमीप्रमाणे कुल आणि प्रसन्न तुम्ही आजकाल वाटत नाही. अचानक तुम्हाला ब्लड-प्रेशरचा त्रास सुरू झाला नसेल ना?' परवा तर फाईल इकडून तिकडे नेणारा कार्यालयातील सवेकही त्यांना म्हणाला, 'अहो पाटील मॅडम, किती चिडतायसा? तुम्ही सांगितल्यावर दोनच्या ऐवजी चार मिनिटांनी आलो म्हणून एवढा राग? मी काय तुम्हाला आज ओळखतोय? पूर्वी तुम्ही अशा रागावलेलं मला तरी आठवत नाही बघा.'

नेहाची मैत्रीण म्हणाली, 'अगं डॉक्टरना दाखवून ये. चार दिवस विश्रांती घे म्हणजे तुला बरं वाटेल. नहीतरी तू आमच्यासारखी वरचेवर रजा कुठं घेतेस?'

घरांत माई नाहीत. घर आणि ऑफिसचं काम या दोन्हीचा ताण घेण्याची वेळ माझ्यावर कधी आलीच नाही. केवळ यामुळेच माझा स्वभाव असा चिडचिडा झाला आहे असं मोकळेपणानं नेहा बोलली नाही, पण हळूहळू स्वत:च्या मनाशी ती हे कबूल करत होती.

नेहा आठवू लागली. लग्नानंतरचं पहिलं वर्ष नव्याची नवलाई आणि माहेरी-सासरी होणाऱ्या वर्षसणांची रेलचेल यामुळे लग्नाचा वर्षाचा वाढदिवस कधी आला तेच नेहाला समजलं नाही. त्यानंतर दिवस राहिले. चोर-चोळी, माहेरी-सासरी आणि मैत्रिणींकडे झालेली छोटी-मोठी डोहाळजेवणे यात दिवस कापरासारखे उडाले. पहिलं बाळंतपण आईकडे. त्यामुळे तीन महिन्यांच्या सुयशला घेऊन आपण आईकडून या घरी आलो. ऑफिस सुरू झालं. ऑफिसरला जाण्याआधी आणि संध्याकाळी घरी आल्यानंतर आपण सुयशच्या भोवतीचे असे. जवळजवळ रोज आणि रविवारी त नक्कीच आपण प्रथमेशबरोबर सुयशला घेऊन दिड-दोन तास बाहेर फिरायला जात होतो. शिवाय महिना - दोन महिन्यांने आईकडे फेरी व्हायचीच. त्यामुळेच सुयश आणि ऑफिस यापलिकडे घरांत फारसं कधी लक्ष घातलं नाही. प्रत्येक गोष्ट माई हाताशी देत. त्यांच्या प्रत्येक कृतीतून आणि देहबोलीतून हा आपलेपणा पूर्वीही जाणवायचा आणि आजही जाणवतो.

सुयश शाळेत जाऊ लागला. त्याला शाळेत सोडणं, घरी आणणं या साऱ्या गोष्टी माई-आप्पाच करायचे. पण त्या दोघांनीही सुयशला कधी आपल्यावर अवलंबून ठेवलं नाही. त्यांनी त्याला कदाचित स्वावलंबी आणि स्वतंत्र विचारांचा केला असेल. अकरा वर्षांचा सुयश स्वत:च्या जगात आपल्या मित्रांत आणि शाळेच्या जगात

अधिकाधिक रमू लागला. पण त्याचं हे वय समजून न घेता, सुयश आपल्यापासून दूर जातो आहे. हा संसार आपला नाही. आपण घरात कांही करत नाही. आपल्यावर काही जबाबदारी टाकली जात नाही. हे शल्य आणि जोडीला अहंपणाचा विखारी डंख. यामुळे घर आणि नोकरी सांभाळताना काय हाल होतात, किती ओढाताण होते हे अनुभवलेल्या माईंना आपण समजून घेऊ शकलो नाही. मीपणाचं विष मनात खोलवर रुतल्याने आपण कधी याबाबत माईंशी संवाद साधला नाही. आपणहून आज मी अमूक एक करते असंही आपण कधी त्यांना म्हणालो नाही.

या साऱ्या विचारांनी नेहाचं मन शांत झालं. तिला हलकं वाटू लागलं. माई-आप्पा आले की आपणहून त्यांच्याशी छान बोलायचं. मलाही थोडीफार सवय झालीच पाहिजे ना? मग माई मला पण कांहीतरी करू द्या असं बोलत त्यांच्याशी संवाद साधायचा असं नेहानं मनाशी ठरवलं.

निघाल्यापासून सव्वा-दोन महिन्यांनी रविवारी चार वाजता माई-आप्पा आले. गाडी दिसताच धावत जाऊन सुयशने गेट उघडले. नेहानं-प्रथमेशनं माई-आप्पांच्या बॅगा घेतल्या. माई-आप्पा बसल्यावर नेहा म्हणाली, 'गाडीनं आलं तरी बसून बसूनच थकायला होतं. तुम्ही निवांत बसा. मी चहा टाकलाच आहे आणि हो माई, मी स्वत: चिवडा केला आहे. माई, तुमच्यासारखा जमला नाही हे नक्की, पण आतां तुम्ही मला तुमच्या खास टिपस् द्यायच्या. आज रात्रीचा स्वयंपाक मीच करणार. फक्त तुम्ही स्वयंपाकघरात टेबलाशी बसून मी कांही चुकत असेन तर मला सांगायचं.

माई नेहाचं बोलणं, मनाचा कान करून ऐकताना सुखावत होत्या. आमचं इथं नसणं एवढा चमत्कार करेल असं माईंना स्वप्नातही वाटलं नव्हतं.

आपली लेक आणि जावयावर आलेली आपत्ती ही आपल्या घरासाठी इष्टापत्ती ठरली असं माईंना वाटलं. रात्री समाधानात शांत झोपलेल्या माईंना नेहाच्या स्वयंपाक घरातील हालचालीनं आणि चहाच्या वासानं जाग आली. माई आणि नेहा एकत्र बसून चहा घेत होत्या.

**– सौ. कमल हर्डीकर,** मोबा. ९६८९३६९९२६

---

**दिनविशेष (एप्रिल २०२४)**
**फाल्गुन-चैत्र १९४५-४६**
**शोभननाम - क्रोधीनाम संवत्सरे**

**सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**
**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे ।**
**साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**



**बुधवार दि. ३ :** छ. शिवाजी महाराज पुण्यतिथी, छ. राजाराम महाराज पुण्यतिथी, **गुरुवार दि. ५ :** संत श्री बाळूमामा उत्सव, आदमापूर, **रविवार दि. ७ :** जागतिक आरोग्य दिन, **सोमवार दि. ८ :** छ. संभाजी महाराज पुण्यतिथी, दर्श सोमवती अमावास्या, **मंगळवार दि. ९ :** गुढी पाडवा, **नूतन वर्षाभिनंदन, बुधवार दि. १० :** श्री स्वामी समर्थ प्रकट दिन, संत झुलेलाल जयंती, **गुरुवार दि. ११ :** महात्मा फुले जयंती, रमजान ईद, **शनिवार दि. १३ :** श्री ज्योतिर्लिंग षष्ठी यात्रा जोतिबा डोंगर, **रविवार दि. १४ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, **बुधवार दि. १७ :** श्रीराम नवमी, **रविवार दि. २१ :** श्री महावीर जयंती, **सोमवार दि. २२ :** जागतिक वसुंधरा दिन, **मंगळवार दि. २३ :** श्री हनुमान जयंती, ज्योतिर्लिंग यात्रा, कोल्हापूर, **बुधवार दि. २४ :** श्री महालक्ष्मी रथोत्सव, **गुरुवार दि. २५ :** छ. शिवाजी महाराज (ताराराणी) रथोत्सव, कोल्हापूर, **शनिवार दि. २७ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो. १०.०२), **मंगळवार दि. ३० :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती.

# माझी बँकेतील मुशाफिरी

## (एका बँक अधिकाऱ्याचे विलक्षण अनुभव)

प्रत्येक बँकेत टॉप मॅनेजमेंटचे काही लाडके कस्टमर असतात. त्यांचे दोन प्रकार आहेत. एक प्रकारचे कस्टमर सधन, सक्षम, संपन्न असतात, वागणुकीला रॉयल असतात. सर्व कायदेकानू व्यवस्थित पाळतात. त्यांची फक्त बँकेच्या स्टाफकडून आदराच्या वागणुकीची अपेक्षा असते. दुसऱ्या प्रकारचे कस्टमर मात्र अगदी उलट प्रकारचे असतात. कायम घोड्यावर बसून आल्यासारखी त्यांची वागणूक असते. सगळ्या स्टाफला ते नेहमी वेठीला धरतात. केशवसुतांच्या कवितेमध्ये थोडा बदल करून त्यांचे असे वर्णन करावेसे वाटते,

आम्ही कोण म्हणून काय पुसता,
आम्ही असू लाडके बँकेचे
बँकेने दिधले असे जगत हे आम्हास खेळावया
विश्वी या वशिल्याबले विवरतो चोहीकडे लीलया

त्यांना असेही वाटते,

आम्हाला वगळा. गतप्रभ झणी होतील बँकांगणे
आम्हाला दुखवा, होईल तत्क्षणी दुष्कर तुमचे जिणे
असो…

वास्तविक पाहता बँकेच्या टॉप मॅनेजमेंटचा नियमाला सोडून वागा असा काहीच आग्रह नसतो आणि तिला या लोकांच्या शाखेतल्या दादागिरीची काहीच कल्पना नसते. आता प्रथम आपण पहिल्या प्रकारच्या कस्टमरचा गोड अनुभव पाहू.

एक मोठा व्यापारी आमचा कस्टमर होता. तो मोठमोठ्या कंपन्यांकडून ९० दिवसांच्या उधारीवर माल उचलून छोट्या छोट्या व्यापाऱ्यांना ६० दिवसांच्या उधारीवर विकत असे आणि त्यांच्याकडून वसुली करून ९० व्या दिवशी पुरवठादार कंपनीला पैसे चुकते करत असे. हा सर्व व्यवहार बँकेच्या माध्यमातून होत असे. वर्षानुवर्षे करोडोंमध्ये हा व्यवहार चालू होता. बँक पुरवठादार कंपनीला याच्या वतीने पतपत्र (LETTER OF CREDIT) जारी करत असे. पुरवठादार कंपनी मालाची कागदपत्रे थेट बँकेला देत असे आणि बँक ९० व्या दिवशी थेट त्यांना पैसे देत असे.

या व्यवहारावर बँकेने दुहेरी चार्ज लावणे जरुरीचे होते. एकदा व्यापाऱ्याच्या नावे आणि दुसऱ्यांदा पुरवठादार कंपनीच्या नावे. पण सुरुवातीपासूनच बँक फक्त एकेरी चार्ज लावत होती. अशाप्रकारे उत्पन्नाची गळती होत होती. (LEKGE OF INCOME ). तपासणी अधिकाऱ्यांनी बँकेची तपासणी करताना हे शोधले. वसूल न केलेली एकूण रक्कम लाखांच्या घरात होती. आता काय करायचे हा मोठाच प्रश्न होता. वर्षानुवर्षे सुरुवातीपासून फक्त एकेरी चार्ज लागत असताना आता लाखो रुपयांत दुहेरी रक्कम कस्टमरच्या खात्यात डेबिट करून वसूल करणे योग्य आणि शक्य नव्हते. परंतु रक्कम तर वसूल करणे आवश्यक होते; न झाल्यास माझ्यावर दंडात्मक कारवाई नक्कीच होती. सरतेशेवटी एक प्रयत्न म्हणून मी कस्टमरला फोन करून सर्व परिस्थिती विशद केली. मला तो हे पैसे देईल हे जराही वाटत नव्हते.

पण काय सुखद आश्चर्य ! कस्टमर म्हणाला, ‘साब, ये चार्जेस नियम के अनुसार है ना? फिर बिलकुल फिक्र ना किजीये । हमारे खाते मे डाल दीजिए । हम कोई सवाल नही उठायेंगे।’

मला एकदम हायसे वाटले आणि मी ताबडतोब रक्कम वसूल केली.

वाचकांपैकी जे कोणी बँकर असतील, त्यांना हे नक्कीच लक्षात येईल की अशाप्रकारे जुनी रक्कम वसूल करणे किती कठीण असते ते, विशेषतः कस्टमरची काही चूक नसताना आणि त्याची वरपर्यंत ओळख असताना ! कस्टमर असेही म्हणू शकला असता की तुम्ही लावलेले चार्जेस मी कॉस्टिंग मध्ये घेतले आणि त्याप्रमाणे मी माझ्या ग्राहकांचे बिलिंग

केले. मला आता थोडचे माझ्या ग्राहकांकडून वसूल करता येणार? सबब, जुने पैसे मी देणार नाही. यापुढे तुम्ही दुहेरी चार्जेस लावा, मी ते देईन, पण जुन्या व्यवहारावर नाही देणार.

पण अशाप्रकारे काहीही वाद न घालता, त्याने सगळे जुने चार्जेस विनातक्रार भरले. हाच खरा त्याचा रॉयलपणा ! शिवाय आपल्या ओळखीचा कुठेही गैरफायदा न घेणे हेही मुद्दाम नमूद करावेसे वाटते. अर्थात कस्टमरशी चांगले संबंध राखणे पण कामाला येते. माझा इतक्या वर्षांचा अनुभव असा आहे की सर्वसाधारणपणे कुठलाही बँकेचा ग्राहक हा व्यक्तिगतरीत्या बँक स्टाफला अडचणीत आणत नाही.

आता दुसरा कडू अनुभव !

हा कस्टमर एक उद्योजक- निर्यातदार होता. धंदा वाढता होता, पण भांडवल कमी होते. म्हणून कायमच पैशाची चणचण असायची. परदेशातून त्याच्या ग्राहकांनी बँकेत पैसे पाठवले रे पाठवले की पैसे उचलण्याची घाई असायची. कुठलाही व्यवहार करताना बँकरला लिखापढी करायला लागते. विशेषतः विदेश विनिमय विभागात, विदेशी पैशाचे विनिमय दराने भारतीय रुपयात रूपांतर करायला लागते आणि या गोष्टीला आणखी जास्त वेळ लागतो. परंतु हा ग्राहक सतत वाघ मागं लागल्यासारखा मागे लागायचा. बरं. कधीतरी अशी घाई समजू शकते, पण याची कायमच घाई. त्यामुळे सगळे अगदी जेरीला आले होते. शिवाय अशा दबावाखाली काम करताना हिशेबात चुका होऊ शकतात, त्याचाही मानसिक ताण. केव्हाही हा गृहस्थ आला रे आला की त्याचे काम प्रथम करायला हवे असा त्याचा आग्रह असायचा. त्यामुळे इतर ग्राहकही नाराज व्हायचे. शिवाय हा पडला लाडका, त्यामुळे याला दुखवूनही चालणार नव्हते. अशा परिस्थितीत याचा एक आयात केलेला माल भारतात आला. हा माल म्हणजे त्याच्या कारखान्याकरता लागणारा कच्चा माल होता आणि त्याशिवाय त्याचे उत्पादन ठप्प झाले होते. याच्याकडे माल सोडवण्याकरता पैसे नव्हते. मग याने वरची ओळख वापरून या मालाची कागदपत्रे, पैसे दिल्याविना त्याला देण्याची परवानगी मिळवली. माझ्याच टेबलवर बसून याने आमच्या बँकेच्या महाप्रबंधकांना फोन लावला आणि फोन माझ्या हातात दिला. महाप्रबंधकांनी मला सांगितले की योग्य ते दस्तऐवज घेऊन मालाची कागदपत्रे कस्टमरला देऊन टाक.

आता काय करायचे? मी आतापर्यंत महाप्रबंधकांशी कधीच बोललो नव्हतो, त्यामुळे त्यांचा आवाजही मला परिचित नव्हता. कस्टमरला तर डॉक्युमेंट लगेचच हवी होती. प्रत्यक्ष मुख्य कार्यालयात जाऊन खातरजमा करण्याइतका वेळ हाताशी नव्हता. याचवेळेस श्री. जिमी नगरवाला रोखपाल, स्टेट बँक ऑफ इंडिया यांचे टेलिफोन संभाषणावरून रु. ६० लाख शाखेबाहेर जाऊन दिल्याचे प्रकरण गाजत होते. काही एक सुचेना .

पण मग एक कल्पना सुचली - मी मुख्य कार्यालयाला फोन लावला. तो फोन ऑपरेटरकडे गेला - तिने मला महाप्रबंधकांच्या सेक्रेटरीला फोन जोडून दिला - मी सेक्रेटरीला महाप्रबंधकांना फोन द्यायला सांगितले. त्यांच्याशी मी भीत भीत वरील व्यवहाराकरता परवानगी मागितली. ते प्रथम माझ्यावर रागावले, पण मी त्यांना स्पष्ट केले की मी त्यांच्याशी कधीच बोललो नाही, त्यामुळे त्यांचा आवाज मला परिचित नाही, शिवाय आधीच फोन कस्टमरने लावला होता, मी नव्हे. त्यामुळे त्याने कुणाला फोन लावला याची खातरजमा कशी होणार? म्हणून मी अधिकृत चॅनेलमधून मी फोन लावला. यावर ते प्रभावित झाले आणि त्यानी परवानगी दिलीच होती त्याचे पुष्टीकरणही केले.

अशा रीतीने कधी कधी अवघड परिस्थितीत मार्ग काढावा लागतो. डॉक्युमेंट नाही दिले तर ग्राहक नाराज होतो तर योग्य खातरजमा केल्याशिवाय जर मी डॉक्युमेंट दिले असते आणि पैसे दिल्याविना डॉक्युमेंट देण्याची खरी परवानगी नसती तर मी अडचणीत आलो असतो. मी योग्य ती सावधगिरी आणि

खबरदारी बाळगलीच होती, पण या प्रसंगावरून सुद्धा कस्टमर घाई घाई करून स्टाफला अडचणीत आणतो हेही स्पष्ट होते.

या कस्टमरला वठणीवर आणणे जरुरीचे होते. सगळ्यांनाच त्याचा त्रास होत होता. हा सगळे व्यवहार, कामकाजाच्या वेळेनंतर करायचा, ते सुद्धा वारंवार. त्यामुळे रोखपालाला बँक बंद होईपर्यंत थांबून रहायला लागायचे, याची रोख रक्कम यायची वाट बघत. काउंटर कारकुनाला याच्या खात्यामध्ये अकाउंटिंग एन्ट्री करण्याकरिता थांबायला लागायचे. पे ऑर्डर / डिमांड ड्राफ्ट कारकुनाला त्याच्याकरिता पे ऑर्डर / डिमांड ड्राफ्ट देण्याकरिता थांबायला लागायचे, डिस्पॅच कारकुनाला याची कागदपत्रे पोस्ट करण्यासाठी थांबायला लागायचे. पण याच्या नाकात कोण वेसण घालणार आणि कसे हा मोठा प्रश्नच होता. शिवाय याने मुख्य कार्यालयाला तक्रार करून पण चालणार नव्हते. कारण शाखेतल्या लोकांनाच उलट दट्ट्या पडला असता. कारण हा लाडका ना !

पण योगायोगाने अशी संधी लवकरच चालून आली. याचा कर्जवाढीचा प्रस्ताव बँकेकडे आला. नियमानुसार यावर शाखेची शिफारस आवश्यक होती आणि मुख्य कार्यालयाने प्रस्ताव शाखेकडे पाठवला. मग कुठलाही मुलाहिजा न बाळगता आणि दडपण न घेता आम्ही शिफारस करताना खालील परिच्छेद जोडला,

"The style of the mangement of the party is mangement by crisis Rather than planning. They are always running short of time and Money. As a result using all pressure tactics to get their work done. This is causing tremendous strain on branch officials lest they make any errors/ omissions which would land them in trouble . While Borrower's growing business certainly requires additionl assistnce. The foresaid aspect be taken into consideration while Increasing their credit limits"

कर्ज प्रस्ताव मुख्य कार्यालयाला पोहोचला. कस्टमरही तेथे धावला, लवकरात लवकर मंजुरी मिळवण्यासाठी. पण संध्याकाळी तोंड पाडून शाखेला परत आला. महाप्रबंधकांनी त्याला स्पष्ट केले होते की वरील प्रकारच्या शाखेच्या टिप्पणी नुसार कर्ज मर्यादा वाढवणे तर दूरच राहिले तर सध्याचे कर्ज कमी करायचा विचार करावा लागेल. जर या प्रकारची शाखेची टिप्पणी असेल तर मी काही करू शकत नाही.

त्याने मग विनंती केली की कृपया ही टिप्पणी काढून टाकावी आणि सुधारित शिफारस वरती पाठवावी. मी सांगितले की हे शक्य नाही. कारण हे वास्तव आहे. कस्टमर गयावया करू लागला. मी सांगितले की तुझी माझी व्यक्तिगत दुश्मनी तर काहीच नाही, पण तुला तुझी वागण्याची, अरेरावीची पद्धत बदलायला लागेल आणि हे सगळ्या स्टाफसमोर कबूल करायला लागेल. त्याने सगळ्या गोष्टी मान्य केल्या. शेवटी बँकेलाही ग्राहक महत्वाचा असतो आणि गमावून चालण्यासारखे नसते. त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवला आणि सुधारित शिफारस मुख्य कार्यालयाला पाठवून दिली. त्याची वाढीव कर्जाची मागणी मंजूर झाली. त्यानंतर कस्टमरचे वागणे पूर्णपणे बदलले आणि तो आमचाही लाडका झाला !

यावरून एक धडा शिकण्यासारखा आहे. कायम मुखदुर्बळ राहून चालत नाही. काही वेळा तोंड उघडून आपल्यावर होणारा अन्याय धाडसाने जगासमोर मांडणे जरुरीचे असते आणि त्याचा फायदा होतो. देव आपली पाठराखण करतोच. माझा देवावर पूर्ण विश्वास आहे आणि मला एकनाथ महाराजांच्या अभंगातील खालील ओळ उद्धृत करावीशी वाटते. ‘सकळ जीवांचा करतो सांभाळ, तुला मोकलील ऐसे नाही.’

**– श्रीकांत शिंत्रे,**

शब्दांकन : **सौ. ज्योत्स्ना शिंत्रे,** मो. ९९२००५८७०५


# मुलांचे पान




## » चित्र रंगवा




## » फरक ओळखा



## » ठिपके जोडून चित्र तयार करा





### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक एकतिसावा)

सोपानाला एकाच वेळी वाईटही वाटलं आणि तिच्या मनातल्या विचारांची गंमतही वाटली. त्यानं मुक्तीला जवळ घेतलं. एका हातानं तिला कुशीत धरून दुसऱ्या हातानं तिचे डोळे पुसले. म्हणाला, ''मुक्ते, अगं वेडी की काय तू? आम्ही असं कसं देवाकडे जाऊ? तुला सांगितल्याशिवाय? तुला विचारल्याशिवाय? आपल्याला देवाकडे जेव्हा जायचं असेल ना तेव्हा एकमेकांना सांगितल्या शिवाय आपल्यातलं कुणीकुणी जाणार नाही आणि तुला सांगितल्याशिवाय तर मुळीच नाही. आता रडू नको हं! शहाणी माझी बाई ती!'' सोपान मुक्तीची समजूत घालत होता. निवृत्ती-ज्ञानेश्वर अनिमिष नेत्रानं पाहत होते. सोपानाच्या शेवटच्या वाक्याला मात्र ज्ञानेश्वरानं दुजोरा दिला. म्हणाला, ''मुक्ते, आई-बाबा आपल्याला न सांगता-सवरता निघून गेले, कारण त्यांना प्रायश्चित्त घ्यायचं होतं; पण आपण जेव्हा देवाकडे जाऊ ना तेव्हा ताठ मानेनं जाऊ आणि अभिमानानं, मिरवीत जाऊ. आई-बाबा गेले, तेव्हा फक्त आपणच रडलो होतो मुक्ते! पण आपण जाऊ ना तेव्हा हे अभिजनच काय, पण ही इंद्रायणी रडेल, हे आकाश रडेल. ही अवघी चराचर सृष्टी अश्रू गाळेल मुक्ता! एक गोष्ट लक्षात ठेव. आमच्या मृत्यूची कल्पना, त्याचा विचार चुकूनसुद्धा मनात आणू नकोस आणि कष्टी होऊ नकोस. कळलं का बाळ तुला?'' ज्ञानेश्वरांच्या या प्रश्नावर मुक्तानं मूकपणे मान डोलावली. काही क्षण तिथं स्तब्धता पसरली. ती तोडली निवृत्तीनं. ''चला, आता घरात जाऊ आणि छानसं माडगं करून खाऊ. चला!'' ते ऐकून मुक्तीचा चेहरा उजळला. मघाशी या तिघांचे चेहरे ब्रह्मा-विष्णू-महेशासारखे बघून ती बावचळली होती, तर किंचितशा कठोर शब्दांत तिची समजूत घालणारा ज्ञानादादा तिला क्षणभर परका वाटला होता; पण आता निवृत्तीदादाचं नेहमीचं बोलणं ऐकून तिला आनंद झाला. फाटक्या झग्यानं डोळे पुसून ती झोपडीकडे पळाली. माडगं जरी निवृत्तीदादा करणार होता, तरी तिला तयारी करायची होती ना? तिच्या या लगबगीकडे बघून तिन्ही भावांच्या चेहऱ्यावर हास्य पसरलं. सोपान म्हणाला, ''निवृत्तीदादा, ज्ञानादादा ही मुक्ता म्हणजे आपल्या या कठोर तपश्चर्येसारख्या जीवनात विसावा आहे ना?'' निवृत्तीनं त्याच्या गालावर थोपटल्यासारखं केलं आणि दोघांचा हात धरून तो त्यांना झोपडीकडे घेऊन आला.

माडगं करून झालं, खाऊन झालं. मुक्तीनं परळ धुऊन ठेवली. निवृत्ती म्हणाला, ''ज्ञानेशा, आता आपण दोघं माधुकरी मागून येऊ. आज गंगेच्या घाटावर जायचं राहू दे! सोपान, तू घरीच अध्ययन कर. आम्ही माधुकरी मागून येतो.'' सोपाननं मूकपणे मान डोलावली. दोघं गेले, तोवर मुक्तीचा केर काढून झाला होता. सोपानानं पद्मासन घातलं. तो आता ओंकार लावणार, तोच मुक्ता त्याच्या जवळ आली.त्याचा हात धरून लाडिकपणे म्हणाली, ''सोपानदादा एक विचारू? मघाशी तुम्ही तिघं जण का रडत होतात? तुम्हाला आई-बाबांची आठवण आली का? आणि तुम्हा तिघांचेही चेहरे मला ब्रह्मा-विष्णू-महेशासारखे का दिसले? मला सांगशील याचं कारण?'' तिच्या त्या प्रश्नानं सोपानही थोडासा गोंधळला. मघाशी तिनं जेव्हा हे सांगितलं होतं, तेव्हा ती नुकतीच झोपेतून उठली आहे, त्यामुळे ती असं काही म्हणत असेल, असं त्याला वाटलं होतं. म्हणून त्यानं आणि निवृत्ती-ज्ञानेशानंही तिकडे दुर्लक्ष केलं होतं; पण आताही

तिनं तोच प्रश्न विचारला म्हटल्यावर सोपान गोंधळला. ''मुक्ते, खरचं का गं आमचे चेहरे ब्रह्मा-विष्णू-महेशासारखे दिसत होते? तू नीट पाहिलंस? तू तेव्हा पूर्ण जागी होतीस? की तो तुझ्या मनाचा भ्रम होता?'' सोपानाच्या या प्रश्नाचा मुक्ताला खरंतर थोडा रागच आला. 'म्हणजे याला काय वाटतं, मी झोपेत चालते-बोलते की काय?' पण सोपानाकडून सगळ्या प्रश्नांची उत्तरं मिळवायची होती. म्हणून तिनं तो राग गिळला आणि म्हणाली, ''नाही दादा! मी झोपेत नव्हते. पूर्ण जागी असताना पाहिलं. तुम्ही तिघंही ब्रह्मा-विष्णू-महेशासारखे दिसत होता. अगदी श्री दत्तात्रेयाची मूर्ती असते ना तसे! ते कसं काय रे दादा?'' मुक्तीने पुन्हा विचारलं; पण सोपानाकडे या प्रश्नाचं उत्तर नव्हतं! पण मुक्ताला काहीतरी उत्तर देणं भाग होतं. त्याशिवाय ती शांत बसली नसती; पण सोपानला तर काहीच सांगता येत नव्हतं! काहीतरी अर्धवट उत्तर देऊन चालणार नव्हतं. सोपान मोठ्या चिंतेत पडला. आता तिला काय सांगावं, याचा तो विचार करत होता. त्याच्यापुढे फार मोठं प्रश्नचिन्ह होतं; पण त्याचं नशीब जोरावर असावं! मुक्ता पुन्हा त्याला काहीतरी विचारणार, तोच कावेरीअक्का तिथं आल्या, ''मुक्ता, बाळ आवरलं का तुझं? आज तुला मांडे शिकवायचे आहेत ना? मग चल लवकर. पुन्हा ऊन चढलं की, पीठ विसविशीत होतं. चल, आत्ताच करू या!'' कावेरीअक्कांचं बोलणं ऐकून सोपानला उत्साह आला. मुक्तीच्या प्रश्नांच्या फेऱ्यातून त्याची सुटका झाली होती. तो गडबडीनं म्हणाला, ''वा, वा! मुक्ता, तू मांडे करायला शिकणार, छान छान! जा बाळ तू! मी ठेवतो वैलावर भाताचं आधण. जा तू! कावेरीअक्का तुमच्या हाताखाली शिकून मुक्ता आता पानगे काय छान करते! जा मुक्ता तू! जाऽ!'' सोपानाचं बोलणं ऐकून अक्कांनाही स्फुरण चढलं! ''तर तर! मग शिकवतंय कोण? पण पोर मोठी हुशार आणि एकपाठी आहे हो! एकदा एखादं काही शिकवलं, लगेच येतं तिला. चल मुक्ते, चल पोरी लवकर!'' असे म्हणून अक्का तिला हाताला धरून घेऊनही गेल्या. मुक्ता मात्र जाताना पाठीमागे वळून सोपानाकडे रागाचा एक कटाक्ष टाकून गेली. सोपानानं हसू दाबलं! आणि सुटकेचा श्वाश टाकला. मुक्ता वळणावर वळेपर्यंत मागे वळून बघत होती. ती वळणावर दिसेनाशी झाल्यावर सोपाननं वैलावर भाताचं आधाण टाकलं आणि पद्मासन घालून पाठांतराला बसला; पण मुक्ताला पडलेला तो प्रश्न त्याच्याही मनाला सतावतच होता.

निवृत्ती-ज्ञानेश्वर माध्यान्हीला परत आले. मुक्ताही त्यांच्या पाठोपाठच आली. आल्यावर तिची बडबड चालू झाली. अक्कांनी मांडे कसे शिकवले, मी कशी लगेच शिकले, अक्कांना करून कसं दाखवलं, त्यांनी कशी शाबासकी दिली, बक्षीस म्हणून पेढा कसा खायला दिला, हे सगळं ती उत्साहाने सांगत होती. तिघांनी कौतुकानं ते सगळं ऐकलं. तिला मध्येच थांबवून सगळी जेवायला बसली. भात झालाच होता. माधुकरीतलं काहीबाही घेतलं, पण अक्कांनी मुक्तानं केलेलेच मांडे कौतुकानं पाठवले होते. मांडे झाले होते सुरेख; पण त्यांचे आकार मात्र वेगवेगळे होते! तिघांनी मुक्ताचं खूपच कौतुक केलं. मुक्ता खुलली. कावेरीअक्कांच्या घरात आणखी काय काय झालं, ते आठवून सांगू लागली. तिच्या त्या बडबडीमुळे ते मांडे आणखीच गोड लागले. जेवणं छानं झाली. मुक्तानं पाठचं सगळं आवरून घेतलं.

निवृत्ती-ज्ञानेश्वर-सोपान अंगणातल्या शेवग्याच्या सावलीला येऊन बसले. निवृत्तीनं सोपानाला आपल्या जवळ बसवलं आणि म्हणाला, ''हे बघ सोपान, आम्हाला दोघांना असं वाटतं की, आता गुरुउपदेश घेण्याइतका तू जाणता झाला आहेस. तेव्हा तुझ्या मनात कोणाला गुरू करावं असं आलं असेल, तर तसं सांग. फक्त ती व्यक्ती तुझा गुरू होण्यायोग्यतेची असावी.'' निवृत्तीचं हे बोलणं ऐकून सोपान क्षणभर मूक झाला. एक नजर त्यानं ज्ञानेश्वरावर टाकली. मग तो झटकन उठला आणि

वाकून निवृत्तीचं पाय धरले, म्हणाला, ''दादा, मला असं दूर लोटू नकोस. तुझ्याशिवाय माझा गुरू दुसरा कोण असू शकेल? तू ज्ञानादादाला गुरुगंडा बांधलास. मलाही बांध. तुझा शिष्य होण्याचं भाग्य मला लाभलं, तर मी स्वत:ला भाग्यवान समजेन. दादा, पिता होऊन तू माझा सांभाळ करतो आहेसच. आता गुरू होऊन मला मार्गदर्शनं कर. मला शिष्य करून घे. मला दुसरा गुरू कुणी नको!'' सोपानाच्या आर्त स्वरानं निवृतीच्या काळजात कालवाकालव झाली. त्यानं सोपानाला उठवलं. आपल्याजवळ बसवलं. म्हणाला, ''सोपान, तू माझा शिष्य झालास, तर मला ते नक्कीच आवडेल; पण मी आहे नाथपंथी. त्या गुहेत मला गहिनीनाथांनी नाथपंथाची दीक्षा दिली. नाथपंथ हा इतर पंथांपेक्षा वेगळा आहे. थोडासा अवघड आहे. तत्त्वांचं काटेकोरपणे पालन करणारा आहे. त्या दृष्टीनं तू लहान आहेस म्हणून मी म्हणतो!''

निवृत्तीचं बोलणं ऐकून सोपान काहीसा विचारात पडला. मग एकदम उत्तेजित स्वरात म्हणाला, ''दादा, तुला गहिनीनाथांनी नाथपंथाची दीक्षा दिली, तेव्हा तूही लहानच होतास की... मग मलाही चालेल, पण मला टाळण्यासाठी तू हे कारण...!''

''नाही सोपाना नाही! असं मनातदेखील आणू नको. अरे, तुझ्यासारखा शिष्य लाभणं म्हणजे एकलव्यासारखा शिष्य लाभण्यासारखं आहे. सोपाना, ज्ञानेशा, तुम्ही दोघं म्हणजे माझे दोन नेत्र, दोन डोळे आहात. तुमच्या दृष्टीनंच मी हे जग पाहतो. सोपाना, मी ज्ञानेशाला गुरुगंडा बांधलाच आहे. उद्या सकाळी ब्राह्ममुहूर्तावर तुला मी माझा शिष्य करून घेतो. मात्र काही ज्ञानसाधना विशेषत्वानं, शांकरीब्रह्म विद्या, गोरक्ष किमया, अष्टांगयोग साधना तुला ज्ञानेशाकडून आत्मसात करावी लागेल. कारण आता तो त्यात पारंगत आहे, तेव्हा उद्या पहाटे ब्राह्ममुहूर्तावर मी तुझा शिष्य म्हणून स्वीकार करेन.'' असं म्हणून निवृत्तीनं सोपानाच्या मस्तकावर हात ठेवला.

डोणीतून पाणी घ्यायला आलेल्या मुक्तानं, 'तू आणि ज्ञानेश्वर माझे दोन नेत्र आहात' हे निवृत्तीचं वाक्य ऐकलं. आपले हात धुऊन ती निवृत्तीजवळ आली आणि विचारलं. ''दादा, ही दोघं जण तुझे डोळे आहेत, मग मी कोण आहे?'' तिच्या या प्रश्नावर मनमुराद हसून ज्ञानेश्वरानं तिचं नाक चिमटीत पकडलं आणि म्हणाला, ''चिमुरडे, तू म्हणजे आमच्या तिघांचं नाक आहेस नाक आणि तुझं 'हे' नाक जरासं नकटं असलं, तरी आमच्या तिघांचं 'हे' नाक चांगलंच धारदार आणि टोकदार आहे बरं का? इतकं टोकदार, की त्यावर माशीसुद्धा बसू शकत नाही!''

''पण रुसवा मात्र कायमचा बसलेला असतो,'' सोपानानं ज्ञानेशाला दुजोरा दिला. ''आणि फणकारा तर मुक्कामालाच असतो!'' निवृत्तीनंही री ओढली आणि तिघं भाऊ खळखळून हसले. फणकाऱ्याचा मुक्काम दाखवत मग मुक्ता फणकाऱ्यानं आत गेली. तिघांच्या हसण्याचा नाद तिच्या पाठोपाठ आत झोपडीतही आला. (क्रमश:)

**– सौ. मंजुश्री गोखले,** मो. ८८०५३५५२००


## योगवर्गाचे आयोजन

शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, महाद्वार रोड, अंबाबाई मंदिर परिसरातील नागरिकांसाठी योग विद्याधाम, कोल्हापूर आणि कोल्हापूर चित्पावन संघ यांचे संयुक्त सहकार्याने कोल्हापूर चित्पावन संघ हॉल, गुरुमहाराज वाड्यानजीक, मिरजकर तिकटी, कोल्हापूर येथे रोज सकाळी ६ ते ८ या वेळेत योगासन वर्ग सुरू झाले आहेत. तरी इच्छुक योगसाधकांनी सदर वर्गाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.

**सौ. सिद्धी बकरे – 8275606627,**

**श्री. रोहित गवळी – 9657963475**

# सोपानदेवांची ‘अलौकिक सोपानदेवी’

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमशः वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

**अध्याय ५ : कर्म संन्यास योग**

**अर्जुन नुवाच ।**

**अर्जुन म्हणे श्रीकृष्ण नाथा ।**
**पूर्वी संन्यास आणि कर्मयोग सांगितला होता ।।**
**तरी कर्म की संन्यास आता । तो मज सांग निश्चयेसी ।।**
कृष्णा संन्यास कर्मांचा तसा योग हि सांगसी ।
दोहोंत जें बरें एक सांग तें मज निश्चित ।।१।।

**श्रीभगवानुवाच ।**

**श्रीकृष्ण म्हणे गा पार्था । कर्म संन्यास उभयतां ।**
**फळ एक दोहींचे विचारिता । परंतु कर्म श्रेष्ठ ।।**
योग संन्यास हे दोन्ही मोक्ष-साधक सारखे ।
विशेष चि परी योग संन्यासाहूनि मानिला ।।२।।

**जाणावया ऐसे नित्य संन्यासी ।**
**जया द्वेष नाही मानसी । तो द्वंद्व तुटोनी पावे ज्ञानासी ।**
**बद्धापासुनी सुखे सुटे अर्जुना ।।**
तो जाण नित्य-संन्यासी राग-द्वेष नसे जया ।
जो द्वंद्वावेगळा झाला सुखें बंधांतुनी सुटे ।।३।।

**सांख्य आणि योग हे दोन्ही । यासी वेगळे म्हणती अज्ञानी । ते भिन्ने नव्हती म्हणोनी । दोहींचे फल एक ।।**
म्हणती सांख्य-योगांतें भिन्न मूढ न जाणते ।
बाणो एक हि ती निष्ठा दोहींचे फळ देतसे ।।४।।

**सांख्येन स्थान पाविजे । योगेहि तेंची भोगिजे ।**
**सांख्ये आणि योगे एकचि जाणिजे ।**
**ऐसे जो देखे तो देखे ना ।।**
सांख्यांस जें मिळे स्थान तें योग्यांस हि लाभतें ।
एक-रूप चि हे दोन्ही जो पाहे तो चि पाहतो ।।५।।

**योग विरहित दुःखी होती कांही ।**
**न पावेगा संन्यासें कांही ।**
**योगे करूनिया पाही । सुख त्वरितचि होय ।।**
योगावांचूनि संन्यास कधीं साधे चि ना सुखें ।
संयमी योग जोडूनि ब्रह्म शीघ्र चि गांठतो ।।६।।

**योग कर्म गा केलिया । शुद्धत्व होय आत्मया ।**
**जितेंद्रियासहित आपणिया ।**
**सर्वभूती आत्मत्व देखें ।।**
अंतरीं धुतला योगी जिंकूनि मन इंद्रियें ।
झाला जीव चि भूतांचा करूनि हि अलिप्त तो ।।७।।

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत.**

# कप ऑफ टी...

'तुम्हाला भीती वाटत नाही?' त्याने नंदिताला प्रश्न विचारला.

सहप्रवासी एकदम असा काही प्रश्न विचारेल याचा तिला अंदाज नव्हता. ती शांतपणे त्यांच्याकडे पाहत म्हणाली, 'का वाटावी मला भीती?... मी काही चुकीचे वागतेय का?'

'नाही, तसं नाही. पण तुम्ही बिनधास्त अशा... माझ्याबरोबर गप्पा मारताय... तशी फारशी ओळख नाही आपली... किंवा असं तोंडओळख असताना तुम्ही...'

नंदिता हसत म्हणाली, 'नाही, मुळात माझं काम असंच आहे. जिथे ओळख काढून माझ्या सगळ्या गोष्टींची मला माहिती द्यावी लागते. तास दोन-दोन तास माझ्या या सगळ्या प्रोडक्टबद्दल सांगावं लागतं. मग घाबरण्याचा प्रश्न येतोच कुठे? आणि तुम्ही घरच्या किंवा समाजातील लोकांचा विचार करून म्हणत असाल तर ते मी माझ्या नजरेतून पहा असं म्हणेन... कारण, त्यांच्या नजरेतून आपण कधीच आपल्याला बघू नये असं लहानपणापासून शिकत आलेय मी...'

नंदिताचे बोलणं ऐकून त्याचा थोडा धीर चेपला. आपण चुकीच्या व्यक्तीबरोबर नाही ही त्याची खात्री पटली. अन् मग तो खूप काही बोलत होता.

आपले गावं, शेतीवाडी, घरची माणसं, नोकरी, सगळ्या विषयी... थोडावेळ गेला अन् नंदिताने आपले शेताला उपयुक्त असणारे सगळे प्रॉडक्ट त्याला सांगितले. नवीन आलेल्या कीड नाशकासंदर्भात नीट माहिती दिली. त्यांच्याकडे कोणती उत्पादन घेतात हेही विचारले.

हातातल्या सगळ्या प्रॉडक्टची माहिती देऊन झाल्यावर नंदिताने विचारले, 'चहा घेउया? मला मस्त चहाची तलफ आली आहे. वातावरणही छान आहे.'

तो थोडा संकोचला. असे नव्हते कि तो बायकांशी कधी बोलला नाही. पण का कुणास ठावूक नंदिताशी बोलताना त्याला थोडं अवघडलेपण आले होते.

नंदिताने त्याची ही अवस्था जाणली. ती म्हणाली, 'मिस्टर सोपानराव जाधव, तुम्ही अवघडून जावू नका. रिलॅक्स बसा...'

थोडा वेळ शांततेत गेल्यावर नंदिताने सुरुवात केली...

'तुम्ही खूप वर्ष करत असाल ना शेती? तुमची आधी खूप जमिन होती का? वडील, आजोबा देखिल हेच करायचे का? सोपानराव, एकूण किती उत्पन्न निघते हो शेतीतून?'

सोपान एकदम म्हणाला, 'तसं कधी सांगू नये असं आबा म्हणतात. आणि तुम्ही मला सोपानराव नका म्हणू. नुसते सोपान म्हणा.'

'असं कसं? तुम्ही अनुभव आणि वय दोन्ही गोष्टीनं मोठे आहात.' नंदिता म्हणाली.

'पण नको, तुम्ही नुसते सोपान म्हणा.' तो पुन्हा म्हणाला.

नंदितालाही चटकन कळेना. पण 'ठीक आहे सोपान, तुम्ही नोकरी आणि शेती याचा कसा काय मेळ घालता?'

तसा सोपान हसला. म्हणाला, 'हे सगळं माझ्या मेहनतीवर आणि आबांच्या पुण्याईवर कमावलय. पिढीजात नाही काही. जे हाय ते आमच्या कष्टाची भाकरी आहे. नशिबाच्या गोष्टी सगळ्या.'

नंदिताने हसत विचारले, 'अहो, कष्ट केले की सगळं मिळतच की. नशीब कशाला लागत?'

सोपान थोडा गंभीर झाला.

'नाही, तुम्ही म्हणताय ते खरं आहे. कष्ट खूप केले, शिकलो, शेतीवाडी वाढवली, जोडीला नोकरी केली. पण नशिबानं साथ दिली म्हणून... नाहीतर

एकेकाळी अन्नाला महाग होतो. तेव्हा आमच्या गुरुजींनी आम्हाला सांगितले, समजावले. म्हणून आज हे दिवस बघतोय.

नंदिता त्याच्या साऱ्या बोलण्याकडे नीट लक्ष देऊन होती. 'आपल्या आयुष्यात किती जणांचे कसे कसे वाटे असतात. किती जणांच्या मदतीने आपण घडत असतो हे कधी लक्षात येत नाही चटकन.'

बोलता बोलता सोपान थांबला.

'आज गुरुजी हवे होते हे सगळं बघायला. खुश झाले असते.'

सोपानचा आवाज नकळत ओलावला. नंदिताने त्याच्या चेहऱ्यावरचे हावभाव टिपले. एखादी गोष्ट आतपर्यंत टोचावी तसं काहीसं जाणवलं तिला.

ती म्हणाली, 'तुम्हाला बोलावस वाटत असेल तर तुम्ही माझ्यापाशी बोलू शकता. तुम्हाला मोकळ वाटणार असेल तर...हं !'

सोपानने चटकन तिच्याकडे पाहिले आणि का कुणास ठावूक, ती एकदम आपली वाटावी अशा स्वरात तो म्हणाला, 'गुरुजी आता राहिले नाहीत. त्यांच्या नसण्याचे पण दुःख नाही. पण ते ज्या मनस्थितीत गेले त्याचे वाईट वाटतंय.'

'का... काय झालं?' नंदिताने सहज प्रश्न केला.

'सांगतो. आमच्या भागात पंचक्रोशीत एकच शाळा. सगळी मुलंमुली इथेच या शाळेत येऊन शिकायचे. अर्थात सगळी वेगवेगळ्या जातीची, धर्माची, बुध्दीची, परिस्थितीची अशीच मुले होती. गुरुजींनी किती पिढ्यांना आपल्या चांगल्या संस्कार आणि शिस्तीने मार्गी लावले. खूप वर्ष ही सेवा मनोभावे ते करत होते. पगार होताच हो, पण पूर्वीच्या काळी तुम्हाला तर माहितीच आहे. त्याकाळी लोक पैशाला जास्त महत्त्व देत नव्हते. गुरुजीही तसेच होते. माझ्यासारखे कितीतरी विद्यार्थी त्यांनी वेळप्रसंगी आपल्याकडचे पैसे घालून मोठे केलेत. पण सगळेच कुठे सारखे असतात? किती वर्ष हे अविरत चालू होतं. माझ्या पुढे-मागे असलेल्या मुलांच्यातही कुणी ढ वर्गातले होतेच की. अशाच एका गुंडवृत्तीच्या मुलाला गुरुजींनी वेळप्रसंगी काठीचा धाक दाखवून योग्य मार्गाला आणायचा प्रयत्न केला होता. पण वृत्ती बदलत नाही. दिवस असेच जात होते. गुरुजी आता रिटायरमेंटला आले होते. शेवटी आपल्या कर्तव्यातून मोकळे होताना ताठ मानेने व्हावे एवढीच इच्छा होती त्यांची ! पण, नशीब मी म्हणतो ना, ते हेच. परिस्थिती कधी कसा उपहास करेल नाही सांगता येत. आपण आपले कर्म करत जातो, पण पुढे काय हे कुठे माहिती असते? आपण ठरवतो तसं थोडच होतं? नियतीच्या योजनेत काही वेगळंच असतं. तिच्या लेखी हिशोब इथेच पुरा करायचा. माणूस संपून त्याची राखही उडून जाते... काही राहत नाही... मग मन उद्विग्न होते...

गुरुजींच्या बाबतीत असंच झालं होतं. रिटायर्मेंटनंतर समाधानाने पुढील आयुष्य कंठायचं इतकेच तर अपेक्षिलं होतं त्यांनी... पण....

ज्या दिवशी त्यांचा निवृत्तीचा सत्कार होता त्या दिवशी ते खूप बेचैन होते. घरची मंडळी त्यांना म्हणत होती की राहु दे बरं वाटत नसेल, जाऊ नका.

पण तेही त्यांना पटत नव्हते. शेवटी सत्काराला गेले. सत्कार कसाबसा स्वीकारला आणि खाली मानेने डोळ्यात पाणी भरून आले. तसेच घरी आले. कारण... कारण आजवर ज्या मुलाला त्याच्या वाईट वृत्ती, गुंडप्रवृत्तीसाठी त्यांनी विरोध केला होता, त्याच्याशी तत्त्वाने वाद घातला होता, त्याच्या दुष्कृत्यासाठी शिक्षा केली होती तोच राजकीय पक्षाचा मान्यवर प्रमुख पाहुणा म्हणून व्यासपीठावर त्यांच्या शेजारी बसला होता. त्याच्या हस्ते त्यांचा सत्कार होता.

चांगल्या गोष्टीचा सत्कार... असा? आयुष्यभर तत्त्वं संभाळून संस्कार केले... त्याचे मोल मातीत मिसळले गेले... हा परिस्थितीचा न्याय? हे कुठले नशिबाचे दान?

ही बोच, सल, हा उपहास गुरुजींना सहन होणारा नव्हताच. अखंड आयुष्यभर ज्यांनी सज्जन, सत्य, सद्गुणांची उपासना केली, त्यांचा हा उपहास.

आणि व्हायचे तेच झाले... गुरुजी निवृत्तीनंतर जगाचाही निरोप घेऊन गेले...'

सोपान काही क्षण बोलायचा थांबला. त्याचा दुखावलेला स्वर नंदितालाही जाणवला. तीही काही वेळ गप्प बसली. खुणेनीच टपरीवरच्या चहावाल्याला चहा सांगितला. सोपानने चहा घेतला. त्यालाही खूप बरं वाटलं.

माणसाचे मन सतत कशा ना कशाने भरत असतेच. ते वेळीच हलके, रिकामे व्हावे लागते. त्यासाठी फक्त समोर शांतपणे चहाच्या वाफेसारखं विरून जाणारं... ऐकून घेणारं हवं....

नंदिता म्हणाली, 'सोपान, तुम्ही प्रॉडक्ट घ्या अथवा नका घेऊ. पण कधी वाटलं तर भरून आलेल्या मनाला रिकामे करायला मला चहा प्यायला नक्की बोलवा.'

तिच्या या वाक्यावर सोपान मनापासून हसला. मनात काय ठरवलं त्याने माहीत नाही. पण नंदिताला म्हणाला, 'चहा घेताना असं कुणी बरोबर असेल तर मन किती भरलं तरी... हरकत नाही...'

नंदिताने सहज विचारले, 'मग पुन्हा बोलवणार ना... चहा घ्यायला?'

दोघेही मनमोकळे हसत आपापल्या पुढच्या कामांना निघून गेले.

**– वैदेही जोशी,**
मोबा. ९५४५६३५४६५

सोने-चांदी मौल्यवान खरेदी !

**गोखले ब्रदर्स**
**सराफी दुकान**

**मंगळवार, दि. 9 : गुढी पाडवा**
**मंगळवार, दि. 16 : पुष्य नक्षत्र**

आपलं दुकान
**महाद्वार रोडवर,**
0231–2546585

# वीर ब्राह्मण !

ठरवलंत जर संपवायचं तर,
वाढत जाईल ब्राह्मण!
संपवणारे कचरा होताच, झाडत जाईल ब्राह्मण!

आधी खोड्या काढत नाही,
काढील त्याला चेचतो!
सगळे काटे चुलीत घालून,फक्त फुलं वेचतो!

अटकेपार झेंडा लावतो, लढवत ठेवतो खिंड!
जिथे तिथे लागतोच ब्राह्मण, लग्न किंवा पिंड!

राजांसोबत मृत्यू चाखतो, होत नाही फितूर!
श्रेय घ्यायला धावत नाही, उडून जातो कापूर!

अकेला क्या करेगा?ला, कृतीमधून उत्तर!
कापसासमोर लोणी होतो, वीटेसमोर पत्थर!

ब्राह्मणानेच दिल्लीवरती, केला पहिला वार!
बघणारे तर दुर्दैवीच हो, शिकलेच नाहीत फार!

वांती झाल्यावरती कळलं, पोटात केवढा द्वेष!
दुष्टांसाठी अभय मागतो, तोही ब्राह्मण ज्ञानेश!

ब्राह्मण संपून जाईल एवढा, कुठला मोठा दगा?
कुठली काडेपेटी जाळील, आषाढातल्या ढगा?

चुका सुधरत गेला म्हणून, ब्राह्मण आहे टिकून!
शेवटी अज्ञान जपत बसलात,
सगळ्या शाळा शिकून!

वादापेक्षा संवादावर,ब्राह्मण देतो भर!
ऐकत नाही त्याला सांगतो, आपल्या कर्मान् मर!

- प्रमोद जोशी, देवगड,
मोबा. ९४२३५१३६०४

# मुस्लिम स्त्री कलाकार

## बेगम अख्तर

या लेखमालेतील चौथी कलाकार आहे मल्लिका-ए-गझल म्हणजेच बेगम अख्तर. बेगम अख्तर यांचा जन्म ७ ऑक्टोबर १९१४ रोजी उत्तर प्रदेशात फैजाबाद येथे झाला. तिच्या काकांच्या आग्रहावरून ती पाटणा येथील सुप्रसिद्ध सारंगी वादक इमादात खान यांच्याकडे गायनाचे शिक्षण घेण्यासाठी गेली. त्यानंतर पतीयाळा येथील गायक अता मोहम्मद खान यांच्याकडे ती शिकली.

त्यानंतर आईबरोबर ती कलकत्ता येथे गेली. कलकत्ता येथे तिने लाहोरचे अब्दुल वहीद खान आणि मोहम्मद खान यांच्याकडे शास्त्रीय गायनाचे धडे घेतले.

पंधराव्या वर्षी तिचा जाहीर गायनाचा पहिला कार्यक्रम झाला. त्यावेळी सुप्रसिद्ध कवयित्री सरोजिनी नायडू तेथे हजर होत्या. सरोजिनी यांनी बेगम अख्तर ची खूप प्रशंसा केली. यामुळे बेगम अख्तर यांनी शास्त्रीय गायनामध्ये आणखी रस घेतला आणि १९३४ च्या आसपास मेगाफोन कंपनीने त्यांची पहिली रेकॉर्ड काढली.

त्यानंतर बेगम अख्तर यांच्या दादरा ,ठुमरी आणि गझल याच्या अनेक रेकॉर्ड निघाल्या. दादरा, ठुमरी आणि गझल गायनामध्ये बेगम अख्तर यांचा हात धरणारा कोणीही गायक किंवा गायिका नव्हती आणि त्यामुळेच त्यांना मल्लिका-ए-गझल असा किताब मिळाला. बेगम अख्तर या दिसायला सुंदर होत्या आणि त्यांचा आवाजही लवचिक होता. त्यामुळे त्यांना सिनेमांमध्येही अभिनयाची संधी मिळाली.

१९३३ साली त्यांचा एक दिन का बादशहा हा सिनेमा आला. त्यानंतर अमिना, रूपकुमार, मुमताज बेगम, जवानी का नशा अशा चित्रपटांमध्ये तिने काम केले. १९४२ साली आलेल्या रोटी या सिनेमातही तिने काम केले होते. रोटी या सिनेमाचा दिग्दर्शक होता मेहबूब खान.आणि या सिनेमाचा संगीत दिग्दर्शक होता अनिल विश्वास. अखतरीबाई फिजाबादी, अख्तरीबाई फैजाबादी, अख्तरी आणि बेगम अख्तर अशी अनेक नावे तिला मिळाली.

१९४५ साली तिचे एका बॅरिस्टर बरोबर लग्न झाले. परंतु या लग्नानंतर तिचे खूप नुकसान झाले. कारण नवऱ्याने तिला गायला बंदी केली. परंतु शेवटी १९४९ पासून बेगम अख्तर या परत गायला लागल्या.

लखनऊच्या ऑल इंडिया रेडिओवर त्यांनी तीन गझल आणि दादरा गायला .ते गायन लोकांना खूपच आवडले. त्यांनी नंतर अनेक जाहीर कार्यक्रम केले. सिनेमातील अभिनयामध्ये त्या रमल्या नाहीत. चित्रपट सृष्टीची मोहमयी आणि झगमगती दुनिया त्याना भुरळ पाडू शकली नाही.

त्यांनी शास्त्रीय गायनावरच जोर दिला. त्यांच्या गझल त्या स्वतः बसवत असत आणि गात असत. त्यांच्या  बऱ्याचशा रचना या शास्त्रीय रागांवर आधारित होत्या. त्यांचा आवाज हा अतुलनीय असा होता. त्याची कोणीही कॉपी करू शकत नसे. अगदी वरच्या स्वरांपासून खाली खर्जातील स्वरापर्यंत त्या आपला आवाज कसाही फिरवू शकत होत्या.

१९७२ साली त्यांना संगीत नाटक अकॅडमी अवॉर्डने गौरविण्यात आले .त्यांच्या मृत्यूनंतर त्यांना पद्मश्री व पद्मभूषण देऊन गौरव करण्यात आला.

बेगम अख्तर यांनी एकूण ४०० गाणी म्हटली. अशी ही गझलची राणी १९७४ मध्ये अनंतात विलीन झाली.

**- प्रकाश गानू,**
मोबा. ९४२१९२९८४७

# सुपारीच्या सालापासून तंतू (काथ्या) काढण्याची पर्यावरण पूरक पद्धत

कोकणामध्ये नारळाच्या सोडणांपासून काथ्या काढण्याची पद्धत पूर्वापार सुरू आहे. पण नारळासारख्याच संरचना असलेल्या सुपारीच्या सालापासून मात्र कोणताही फारसा उपयोग करून घेतला जात नाही.

बहुतेक ठिकाणी त्याचा वापर जळण्यासाठी किंवा खूप कमी प्रमाणात खत निर्मितीसाठी केला जातो परंतु त्याच्यामध्ये तंतूंचे प्रमाण जास्त असल्याने चांगल्या प्रकारची खत निर्मिती मात्र होऊ शकत नाही. परंतु गेल्या दहा ते पंधरा वर्षांमध्ये जगात अनेक ठिकाणी सुपारीच्या सालातील तंतूंचा वापर वेगवेगळया कारणास्तव केला जात आहे. मात्र दुर्दैवाने सुपारीच्या सालांमधील तंतू मिळवण्याची कोणतीही सोपी पद्धत सुचवण्यात आलेली नाही. ज्या पद्धती वापरल्या जातात त्यामध्ये रसायनांचा वापर केला जातो. म्हणूनच सुपारीच्या सालातील तंतू काढण्यासाठी पर्यावरणपूरक अशा प्रकारच्या पद्धतीचा अभ्यास मी व माझे माझे सहकारी डॉ. अजित तेलवे, डॉ. संतोष मधाळे, डॉ. प्रिया पाटील कुमारी गायत्री गोखले गेल्या साधारण वीस वर्षांपासून आमच्या मार्गदर्शिका प्रोफेसर डॉ. निरंजना सुनील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहोत.

कोकणामध्ये किनाऱ्यालगत तसेच किनाऱ्या-पासून आत असणाऱ्या भागातही मोठ्या प्रमाणात पोफळीच्या बागा आढळतात. त्यामुळे या सर्व परिस्थितीत पोफळीचे तंतू वेगळे करता येतील अशा प्रकारच्या प्रक्रियांचा अभ्यास आम्ही केला आहे.

सुपारीच्या फळांमधील सुपारी बाहेर काढल्यानंतर उरलेल्या साली शक्यतो सावलीमध्ये पसरून ठेवून वाळवाव्यात. यामुळे सालांमधील पाण्याचे प्रमाण कमी होते. अशी वाळलेली साले एका टाकीमध्ये १२ ते २४ तास पाण्यामध्ये भिजवून ठेवावीत. बांबूच्या साहाय्याने अधून मधून ढवळावे. यामुळे सालांवर साठलेली धूळ, बुरशी तसेच सालातील पेशीमध्ये असणारी विषद्रव्ये पाण्यामध्ये निघून जातात. पाण्यातून बाहेर काढल्यानंतर ही साले निथळत ठेवावीत. त्यातील बरेचसे पाणी निघून गेल्यानंतर खालीलपैकी कोणतीही एक प्रक्रिया वापरून आपल्याला काथ्या मिळवता येतो.

निथळून घेतलेली सुपारीची साले प्लस्टिकच्या किंवा कोणत्याही टाकीमध्ये ठेवून ती पूर्णपणे पाण्यामध्ये बुडतील याची काळजी घ्यावी. एका लिटरला १० मिली एवढे जीवामृत मिसळावे. शक्यतो टाकीवर सूर्यप्रकाश पडू देऊ नये. दर दोन ते तीन दिवसानंतर काठीच्या सहाय्याने पाण्यामधील सुपारीची साले हलवावीत .

शक्य असल्यास दर दहा दिवसानंतर टाकीतील सर्व पाणी बदलावे व पुन्हा नवीन जीवामृत वरील प्रमाणात टाकावे.

याप्रमाणे सुपारीच्या सालापासून काथ्या


**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

'नवस्नेह' च्या माध्यमातून आपल्या पाल्याचे विवाह जुळल्यास पालकांनी कृपया याची माहिती कोल्हापूर चित्पावन संघास कळवावी, ही नम्र विनंती.

काढण्याचा प्रयत्न केल्यास १८ ते २३ दिवसांमध्ये सालांवरील पातळ आवरण नष्ट होते व ३८ ते ४८ दिवसांमध्ये त्याचे तंतू पूर्णपणे मोकळे होतात.

एक महिन्यानंतर दर दोन ते तीन दिवसांनी तंतू कितपत मोकळे होत आहेत हे हाताने पहावे व ते मोकळे होत असतील तर सर्व साले पाण्यातून बाहेर काढावीत व शक्यतो सावलीमध्ये वाळवावीत काठीने थोडेसे झोडल्यास सर्व तंतू पटकन मोकळे होतात.

हीच प्रक्रिया खाडीच्या पाण्यामध्ये सुद्धा करता येते किंवा जीवामृत न घालता गोड्या पाण्यामध्ये करता येते. परंतु विलग होण्यासाठी त्याला थोडा अधिक कालावधी लागतो. गोड्या पाण्यामध्ये काढलेल्या तंतूंचा रंग व ताकद ही चांगल्या प्रकारची राहते.

**जीवामृत तयार करपण्याची कृती**

१०० ग्रॅम गाईचे शेण एक लिटर पाण्यामध्ये मिसळून त्यामध्ये वीस ग्रॅम गूळ व २० ग्रॅम बेसन पीठ घालून व्यवस्थित ढवळून साधारणपणे पाच दिवस ठेवावे. नंतर कापडामधून ते गाळून घ्यावे आणि गाळून आलेले पाणी जीवामृत म्हणून वापरावे. एका लिटरला दहा मिली या प्रमाणात हे जीवामृत घालावे. जीवामृत जास्त प्रमाणात वापरल्यास तंतूंना शेणाचा वास येण्याची शक्यता असते.

**– महेश विजय गोखले,**
इस्लामपूर

# साहित्यिकांची टोपण नावे

०१. अनंत फंदी – शाहीर अनंत घोलप
०२. अनंततनय – दत्तात्रय अनंत आपटे
०३. अनिरुध्द पुनर्वसू – नारायण गजानन आठवले
०४. अनिल – आत्माराम रावजी देशपांडे
०५. अमरशेख – मेहबूब पठाण
०६. अज्ञातवासी – दिनकर गंगाधर केळकर
०७. आनंद – वि. ल. बर्वे
०८. आरती प्रभु – चिंतामण त्र्यंबक खानोलकर
०९. काव्यविहारी – धोंडो वासुदेव गद्रे
१०. कुंजविहारी – हरिहर गुरुनाथ कुलकर्णी
११. कुमुद – स. अ. शुक्ल
१२. कुसुमाग्रज – वि. वा. शिरवाडकर
१३. कृष्णकुमार – सेतू माधव पगडी
१४. केशवकुमार – प्र. के. अत्रे
१५. करिश्मा – न. र. फाटक
१६. केशवसुत – कृष्णाजी केशव दामले
१७. गदिमा – ग. दि. माडगुळकर
१८. गिरीश – शंकर केशव कानेटकर
१९. ग्रेस – माणिक शंकर गोडघाटे
२०. गोल्या घुबड – विष्णुशास्त्री चिपळूणकर
२१. गोविंद – गोविंद त्र्यंबक दरेकर
२२. गोविंदाग्रज – राम गणेश गडकरी
२३. चंद्रिका / चंद्रशेखर – शिवराम महादेव गोऱ्हे
२४. चारुता सागर – दिनकर दत्तात्रय भोसले
२५. छोटा गंधर्व – सौदागर नागनाथ गोरे
२६. बालगंधर्व – नारायणराव राजहंस
२७. जीवन – संजीवनी मराठे
२८. ठणठणपाळ / अलाणे–फलाणे – जयवंत दळवी
२९. तुकडोजी महाराज – माणिक बंडोजी ब्रम्हभट्ट
३०. संत तुकाराम – तुकाराम बोल्होबा अंबिले
३१. तुकाराम शेंगदाणे – ज्ञानेश्वर नाडकर्णी
३२. दत्त (कवी) – दत्तात्रय कोंडदेव घाटे
३३. दया पवार (कवी) – दगडू मारुती पवार
३४. जागल्या (कथालेखक) – दगडू मारुती पवार
३५. दक्षकर्ण – अशोक रानडे
३६. दादुमिया – दा. वि. नेने
३७. दासोपंत – दासोपंत दिगंबर देशपांडे
३८. दिवाकर – शंकर काशिनाथ गर्गे
३९. दिवाकर कृष्ण – दिवाकर कृष्ण केळकर
४०. धनुर्धारी – रा. वि. टिकेकर



# स्वच्छता हेच जीवन !

संत गाडगेबाबा हे एक वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले समाज सुधारक आणि कीर्तनकार होते. त्यांनी स्वेच्छेनेच गरीब राहणी स्वीकारली होती. समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना स्वच्छता आणि चारित्र्य याची शिकवण ते देत असत.

'हात फिरे तिथे लक्ष्मी वावरे' अशी आपल्या मराठी भाषेत एक म्हण आहे. 'Hand is the best instrument' असे आमचे सर्जरी शिकवणारे शिक्षक म्हणत असत.

आपले शरीर निरोगी राहायचे असेल तर केवळ शरीराची बाह्यशुद्धीच नव्हे, तर शरीरातील इतर अवयव सुद्धा स्वच्छ,निर्दोष असणे आवश्यक आहे. योग्य तो सात्विक आहार आणि पाणी यांद्वारे आपण आपले शरीर स्वच्छ ठेवू शकतो. शरीराइतकेच मानसिक आरोग्य सुद्धा महत्त्वाचे आहे. यमनियम, आसन,प्राणायाम, धारणा आणि ध्यान याद्वारे मनाची शुद्धी करता येते.

पूर्वी बाहेरून घरात आल्यानंतर, पाय, हात आणि तोंड धुतल्याशिवाय घरात प्रवेश करण्यास सर्वांनाच मज्जाव असे. काही लोकांना ही सवय असेलच. परंतु आजच्या तरुण पिढीमध्ये मात्र ती अभावानेच आढळते. हाताइतकीच पायांची सुद्धा स्वच्छता महत्वाची आहे.

पाणी आणि अन्न दोन्हीचीही शुचिता अत्यंत महत्त्वाचीआहे. अगदी मोठ्या शहरात सुद्धा स्वच्छ पाणी पिण्यासाठी मिळत नाही. ते स्वच्छ आणि शुद्ध करून घ्यावे लागते. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची साधने वापरण्यापेक्षा, तुरटी लावून निवळलेले पाणी दहा-बारा तास तांब्याच्या भांड्यामध्ये ठेवावे, म्हणजे ते निर्जंतुक होते असे आधुनिक शास्त्र सुद्धा सांगते. त्यासोबतच शरीराला सूक्ष्म प्रमाणात आवश्यक असलेला तांबे हा धातू नैसर्गिक रित्याच मिळतो.

धान्य स्वच्छ करून आणि भाज्या निवडून आपण घेतोच. मात्र धान्य टिकवण्यासाठी बोरिक पावडर पेक्षा एरंडेल तेलाचा वापर करावा. एरंडेल तेलामुळे धान्याला अजिबात कीड लागत नाही.

भाज्या निवडून झाल्यानंतर प्रथम धुवून नंतरच चिराव्यात.

आठवड्यातून एक दिवस शक्यतो दोन्ही एकादशी आणि दोन्ही चतुर्थी, या दिवशी उपवास करावा. उपवास करणे शक्य नसेल तर लंघन करावे. उपवासासाठी साबुदाणा न वापरता उपवासाचे पारंपरिक जिन्नस- वरीचे तांदूळ, शिंगाडा, रताळे, सुरण, भेंडी, काकडी, इ. चा आहारामध्ये उपयोग करावा. लंघनामुळे शरीरशुद्धी होत असते.

बहुतेक आजार अस्वच्छतेमुळेच होतात हे लक्षात आल्याने शासनाने २००० सालापासून संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान सुरू केले आहे.


किसन बाबुराव तथा अण्णा हजारे यांनी लोकांना स्वच्छतेचे महत्व पटवून देऊन, त्यांचे गाव राळेगणसिद्धीला स्वच्छतेच्या बाबतीत जागतिक कीर्तीचा मान मिळवून दिला आहे.

एकंदरीतच आपले अन्न,पाणी, आणि मन स्वच्छ असेल तरच आपले आरोग्य चांगले राहून आयुष्य आनंदी होईल.

**- सुश्मिता गाडगीळ**

मोबा. ९४२१२९०४७७

## नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांच्या दोन कादंबऱ्यांचे प्रकाशन










नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांच्या 'सकाळ प्रकाशन' आणि 'मेनका प्रकाशन' अशा पुण्याच्या दोन प्रकाशकांनी प्रकाशित केलेल्या दोन कादंबऱ्यांचे नुकतेच पुणे येथे प्रकाशन समारंभ झाले. त्याचबरोबर सौ. मंजुश्री गोखले यांच्या पटकथेवर आधारित 'जन्म ऋण' हा सिनेमाही गेल्या महिन्यात प्रदर्शित झाला आहे. चित्पावन संघातर्फे आम्ही त्यांचे अभिनंदन करतो.



## कु. गायत्री उमेश गोखले हिच्या यशाबद्दल हार्दिक अभिनंदन !

शिवाजी विद्यापीठात बी.टेक.च्या तृतीय वर्षात शिकणारी गायत्री उमेश गोखले हिला तिच्या संशोधनासाठी अफ्रिकन पेटंट मिळाले आहे. त्याबद्दल कोल्हापूर चित्पावन संघातर्फे तिचे हार्दिक अभिनंदन ! या संशोधकांचा सत्कार करताना कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी गायत्री हिला विद्यापीठाची पेटंट ॲम्बॅसिडर म्हणून नियुक्त करावे आणि तिच्या माध्यमातून विद्यार्थ्यांतही संशोधन आणि पेटंट प्राप्ती याविषयी जागृती करावी असे आवाहन कुलगुरुंनी केले.

## कोल्हापूर चित्पावन संघात सार्वजनिक बोडण कार्यक्रम संपन्न






कोल्हापूर चित्पावन संघात रविवार, दि. १७ मार्च २०२४ रोजी सार्वजनिक बोडण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी एकूण ८ बोडणे करण्यात आली.

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :** info@shogini.com

**Visit us at :** www.shogini.com


प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी
मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल,
गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.